# महाराष्ट्र विधानसभा

**चौथे अधिवेशन, २०२२**

**सन २०२२-२३ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२**

## आदिवासी विकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ४**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०२, सर्वसाधारण शिक्षण**<br>**बाब क्रमांक: ३१०, रूपये:- ३३,१३,००,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (१) | ४५१२ | १० | पालघर जिल्ह्यात तीन ते सहा वयोगटातील लाभार्थी बालकांना अंगणवाडी सेविंकामार्फत गरम ताजा आहार सुरू करण्यासाठी शासनाने निर्देशित केलेले असणे, त्या अनुषंगाने माध्यान्ह पोषण आहाराच्या नावाखाली राज्य शासनाकडून पुरविण्यात येणारे धान्य निकृष्ट दर्जाचे किडक्या धान्याद्वारे तयार केलेला गरम ताजा आहार अंगणावाड्यांमधील लहान बालकांना दिला जात असणे, राज्य सरकारकडून पुरविल्या जाणाऱ्या धान्याचा दर्जा असमाधानकारक व निकृष्ट धान्याच्या तक्रारी महिला व बालविकास विभागाकडे प्राप्त झालेल्या असूनही शासनाकडून अद्यापही कोणतीही कार्यवाही न होणे, परिणामी किडक्या धान्याद्वारे तयार केलेला गरम ताजा आहार आदिवासी बालकांवर खाण्याची वेळ आली असल्याने विद्यार्थ्यांच्या पोटाचा व आरोग्याचा प्रश्न निर्माण होणे, सदर राज्य शासनामार्फत चालविल्या जाणाऱ्या अंगणवाड्यांमध्ये ठिकठिकाणी निकृष्ट अन्न व धान्याचा पुरवठा करण्यात आला असल्यामुळे यामध्ये जबाबदार असणाऱ्यांची सखोल चौकशी करण्याची मागणी दिनांक १ नोव्हेंबर २०२२ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे करण्यात आलेली असून त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी अंगणवाड्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून करावयाची आवश्यक ती कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: ३१३, रूपये:- ३,२२,४६,६१,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (२) | ४७२७ | १० | पालघर जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळेतील मुला-मुलींची तपासणी करण्याकरिता तलासरी डहाणू तालुक्यातील ग्रामीण रूग्णालयात वैद्यकीय अधीक्षक व वैद्यकीय अधिकारी, त्याचबरोबर सहाय्यक अधिकारी यांची तीन पदे रिक्त असणे, सहाय्यक अधीक्षक औषध निर्माण अधिकारी पयोग शाळा तंत्रज्ञ नेत्र |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | चिकीत्सा अधिकारी वाहन चालक शिपाई अशी महत्वाची २७ पदांपैकी १२ पदे भरलेली असून १५ पदे रिक्त असल्यामुळे तलासरी ग्रामीण रुग्णालायात आरोग्य सेवेचा पुरता बोजवारा उडाल्याने आश्रमशाळेतील मुला-मुलींना तसेच आदिवासी बांधवाना खासगी रूग्णालयात महागडे उपचार घ्यावे लागणे, तसेच परिसरसतील बोगस डॉक्टारांकडून उपचार घ्यावे लागत असणे, या सर्व बाबीकडे शासनाने केलेले दुर्लक्ष स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला असंतोषाची भावना. याबाबत शासनाने तातडीने रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण,**<br>**बाब क्रमांक: ३१७, रूपये:- ६,८३,२५,००,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (३) | ४६५७ | १०० | दिनांक ८ ऑक्टोबर २०२२ रोजी घारगाव तालुका संगमनेर जिल्हा अहमदनगर येथील नाल्यात तुटलेल्या वीज वाहक तारेचा वीज प्रवाह पाण्यात उतरून या नाल्यात अंघोळीसाठी केलेल्या अनिकेत बर्डे, ओमकार बर्डे, दर्शन बर्डे व विराज बर्डे या चार आदिवासी मुलांचा दुर्दैवी मृत्यू झालेला असणे, या पार्श्वभूमीवर या आदिवासी कुटुंबाला शबरी घरकुल योजनेअंतर्गत प्रस्ताव पाठवण्यात येऊनही अद्याप राजूर आदिवासी प्रकल्प अधिकाऱ्यांकडून पुढील कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसणे, यासंदर्भात विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी आदिवासी विकास मंत्र्यांना प्रत्यक्ष बोलणे करूनही घरकुल मंजूर नसल्यामुळे आदिवासी जनतेत पसरलेली नाराजी याबाबतीत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपायोजना.” |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: टी-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५९, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ३२८, रूपये:- ५,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (४) | ४६५५ | १०० | ”आदिवासी विद्यार्थ्यांसाठी नागपूर जिल्ह्यातील खैरी परसोडा रामटेक एकलव्य निवासी शाळा एका भाड्याच्या इमारतीत अनेक वर्षांपासून सुरू असणे, सदर इमारत अतिशय जीर्ण झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण झालेला असणे, तथापि नवीन इमारत दोन वर्षापासून तयार असूनही जाणीवपूर्वक आदिवासी विकास विभागाचे अधिकारी शाळा शिफ्ट करण्याचा निर्णय घेण्यासाठी चालढकल करीत असणे, परिणामी इमारतीचे छताचे काँक्रीट कोसळून बऱ्याचदा विद्यार्थी जखमी झालेले असणे, गळक्या छतामुळे वर्गखोली आणि निवासी खोल्या पाणी साचून इलेक्ट्रिक उपकरणांमध्ये वीज शिरून विजेच्या धक्क्याने विद्यार्थी जखमी होत असणे, याबाबतीत आदिवासी पालकांमध्ये राज्य शासनाच्या बाबतीत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना लक्षात घेऊन दोन वर्षांपासून बांधून तयार असलेल्या नवीन इमारतीमध्ये वसतीगृह हलवण्याची शासनाने करावयाची कार्यवाही.व उपाययोजना" |

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : २२ डिसेंबर, २०२२**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) आदिवासी विकास विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर